**पोलीस उप अधीक्षक कार्यालय,**
**अँन्टी करप्शन ब्युरो, जालना**
दुरध्वनी क्रमांक ०२४८२ –२२०२५२ टोल फ्री क्रमांक – १०६४
dysp.acbjalna@mahapolice.gov.in, dyspacbjalana@gmail.com

# प्रेस नोट

दि. २१.१२.२०२३

**सहायक राज्यकर आयुक्त, वस्तु व सेवाकर विभाग, खामगाव जि बुलढाणा यांना २,५०,००० रुपयेची लाच देतांना मलकापुर जि बुलढाणा येथील दालमील व्यापारी प्रविण अग्रवाल यांना रंगेहाथ पकडले.**

| | | |
|---|---|---|
| आरोपी यांचे नाव | – | प्रविण मदनलाल अग्रवाल वय ४४ वर्ष व्यवसाय व्यापार दालमील,रा. पितृप्रसाद निवास पाळीस बिघा, मलकापुर जि बुलढाणा. ( खासगी इसम ) |
| गुन्हा घडला ता वेळ ठिकाण | – | दि. २०.१२.२०२३ रोजी सहायक राज्यकर आयुक्त, वस्तु व सेवाकर विभाग, खामगाव जि बुलढाणा कार्यालयातील सहायक राज्यकर आयुक्त श्री. राजपुत यांचे कक्षात. |
| लाचेची रक्कम | – | २,५०,००० रुपये. |

तक्रारदार हे सहायक राज्यकर आयुक्त, वस्तु व सेवाकर विभाग, खामगाव जि बुलढाणा या पदावर असुन त्यांनी प्रविण अग्रवाल यांना सन २०१७–२०१८ या वित्तीय वर्षाचा २ कोटी ७७ लक्ष रुपयांचा टॅक्स थकवला म्हणुन दि. २४.०६.२०२२ रोजी प्रथम नोटीस तसेच दुसरी नोटीस १७.०८.२०२२ रोजी व तिसरी नोटीस दि. १०.०२.२०२३ रोजी मे. बजरंग इन्डस्ट्रिज, मलकापुर जि बुलढाणा या दालमील कपनीव्दारे २ कोटी ७७ लक्ष रुपयांचा टॅक्स थकबाकी भरणा करणेबाबत नोटीस काढली होती, तसेच डिसेंबर २०२३ पावेतो व्याजासह २ कोटी ९४ लक्ष रुपये टॅक्सचा भरणा न केल्यास डिसेंबर २०२३ मध्ये मालमत्ता जप्तीची फायनल ऑर्डर काढण्यात येईल, असे कळविले होते. त्यावरुन प्रविण अग्रवाल याने तक्रारदार यांना दालमील कपनीचा टॅक्स कमी करुन फायनल ऑर्डर नील करुन द्या, ३ लाख रुपये देतो. असे लाच देत होता, परंतु तक्रारदार यांची लाच घेण्याची इच्छा नसतांना तो वारंवार लाच देण्याचा प्रयत्न करीत होता, म्हणुन सदर तक्रारदार यांची लाच घेण्याची इच्छा नसल्याने त्यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, जालना येथे तक्रार दिली. त्यावरुन सदर तक्रारीबाबत मा. वरीष्ठांना कळवुन मा. वरीष्ठांचे परवानगी आदेशान्वये खामगाव जि बुलढाणा येथे कारवाई करणेकामी रवाना होवुन सापळा कारवाई केली आहे.

सदर तक्रारीवरुन दिनांक २०.१२.२०२३ रोजी लाचेबाबत पडताळणी केली असता प्रविण अग्रवाल याने तक्रारदार यांची लाच घेण्याची इच्छा नसतांना पंचासमक्ष ३ लाख रुपये देतो, असे म्हणुन लाच देणार असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचे इच्छेविरुध्द प्रविण अग्रवाल याने सहायक राज्यकर आयुक्त, वस्तु व सेवाकर विभाग, कार्यालय खामगाव जि. बुलढाणा यांचे कक्षातील टेबलवर तक्रारदार यांची इच्छा नसतांना दालमील कंपनीचा टॅक्स कमी करुन फायनल ऑर्डर नील करुन द्या, ३ लाख रुपये देतो, असे म्हणुन २,५०,००० रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष ठेवुन दिली असता आरोपीस अँन्टी करप्शन ब्युरो जालनाचे पथकाने रंगेहाथ पकडले आहे. आरोपी प्रविण अग्रवाल याने दिलेली लाचेची रक्कम २,५०,००० जागेवर जप्त करण्यात आली आहे. आरोपी प्रविण अग्रवाल यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

आरोपी प्रविण मदनलाल अग्रवाल वय ४४ वर्ष व्यवसाय व्यापार दालमील,रा. पितृप्रसाद निवास पाळीस बिघा, मलकापुर जि बुलढाणा. ( खासगी इसम ) यांचेविरुध्द पोलीस ठाणे खामगाव शहर जि बुलढाणा येथे गुरनं – ९९५/२०२३ कलम ८ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास श्री. महेश भोसले, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांचेकडे देण्यात आला आहे.

सदरची कामगीरी श्री. संदीप आटोळे, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, छत्रपती संभाजीनगर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. किरण बिडवे, पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, जालना तसेच पथकातील अंमलदार गजानन घायवट, शिवाजी जमधडे, गणेश चेके, गणेश बुजाडे यांनी केली आहे.

तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांचे कडुन आवाहन करण्यात येते कि, कोणी लोकसेवक स्वत अगर इतरांमार्फत शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खासगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२ – २२०२५२, तसेच टोल फ्री क्र १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.९०११९५५५५३ व dysp.acbjalna@mahapolice.gov.in आणि dyspacbjalana@gmail.com वर संपर्क करावा.

(किरण एम.बिडवे)
पोलीस उप-अधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, जालना

Scanned with CamScanner